# MUNGASAJI MAHARAJ MAHAVIDYALAYA DARWHA

**1.2.1 Percentage of Programmes in which Choice Based Credit System (CBCS)/ Elective Courses has been implemented**

***CBCS Letter***

संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ
अमरावती – ४४४ ६०२
(महाराष्ट्र)

वेबसाईट : www.amtuni.com

क्रमांक : संगाबाअवि/६-ब/ए-१४०/२०१७
दिनांक : १/७/२०१७

प्रति,
प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती..

**विषय :- सेमिस्टर पॅटर्न तसेच क्रेडिट ॲन्ड ग्रेड सिस्टीम लागू करण्याबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठ परिक्षेत्रातील संलग्नित महाविद्यालयामध्ये शिकविल्या जात असलेल्या बी.ए., बी.कॉम., बी.बी.ए., बी.ए.(जर्नालिझम व मास कम्युनिकेशन), बी.लिब.सायन्स तसेच एम.ए.,एम.ए.(जर्नालिझम व मास कम्युनिकेशन), एम.लिब.सायन्स इत्यादि अभ्यासक्रमातील परिक्षांना सत्र २०१७-२०१८ पासुन सेमिस्टर तसेच क्रेडिट ॲन्ड ग्रेड सिस्टीम लागू करण्याबाबत त्याप्रमाणे एम.कॉम. या अभ्यासक्रमाच्या परीक्षांना याअगोदच सेमिस्टर पॅटर्न लागु करण्यात आल्यामुळे या अभ्यासक्रमाला क्रेडिट ॲन्ड ग्रेड सिस्टीम लागू करण्याबाबत दिनांक ६/६/२०१७ रोजी झालेल्या विद्वत परिषदेने मान्यता प्रदान केलेली आहे. वर नमुद केलेल्या काही परीक्षांचे अभ्यासक्रम व परीक्षा पध्दती विद्यापीठाचे वेबसाईटवर प्रकाशित करण्यात आलेली आहे. सोबतच सादर पध्दतीनुसार लागू करण्यात आलेला अभ्यासक्रम विविध अधिसूचनाद्वारे विद्यापीठ राजपत्र भाग-२ मध्ये प्रकाशित सुध्दा केलेला आहे. काहींबाबत वेबसाईटवर प्रकाशित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

आपणांस विनंती करण्यात येते की, सक्षम प्राधिकारिणीने मान्य केलेल्या वरील सर्व अभ्यासक्रमाची परिक्षा सेमिस्टर पॅटर्न तसेच क्रेडिट ॲन्ड ग्रेड सिस्टीम नुसार घेण्याचे दृष्टीने आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व संबधितांचे तसेच सर्व विद्यार्थ्यांचे निदर्शनास आणून त्याप्रमाणे पुढील कार्यपध्दती सुरु करावी, ही विनंती.

आपला,
कुलसचिव

Principal
Mungsaji Maharaj Mahavidyalay
Darwha Dist.Yavatmal